**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

2/5/2016
(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
२२७९९३९५

---

प्रसिध्दी पत्रक क्र.०४
दिनांक : ०२.०५.२०१६

## बेस्टच्या बसमार्गांच्या प्रवर्तनातील बदल

मुंबई, ०२ - रविवार दिनांक १ मे पासून बेस्ट उपक्रमाच्या बस प्रवर्तनात काही बदल करण्यात आलेले होते. ज्या बसमार्गांचे उत्पन्न अत्यल्प होते तसेच ज्या बसमार्गांवर प्रवासी प्रतिसाद समाधानकारक नव्हता, अशा ५२ बसमार्गांचे प्रवर्तन रद्द करण्यात आले होते.

परंतू, प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता बेस्ट उपक्रमाच्यावतीने रद्द करण्यात आलेल्या बसमार्गांचे पुन:स्थापन टप्प्याटप्प्याने करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सदरच्या बसमार्गांचा पुढील चौमाही कामवाटप करण्याच्या वेळेपर्यंत आढावा घेण्यात येईल व त्यानंतर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

---